# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नाशिक शहर **P.S.(ठाणे):** सरकार वाडा **Year (वर्ष):** 2021
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0042 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/03/2021 09:58 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Date From (दिनांक पासून):** 02/03/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 02/03/2021
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Time From (वेळेपासून):** 16:17 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:17 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/03/2021 **Time (वेळ):** 00:53 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/03/2021 00:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** महिला समूपदेशण केंद्र ,नाशिक तालूका पोस्टे आवारात ना

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** सरकार वाडा
**District(State) (जिल्हा(राज्य)):** नाशिक शहर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
**(a) Name (नाव):** भगवान विठोबा बोराडे
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1939 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पारापोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेषराव महाराज चौक म्हसोबा गल्ल,वैशाली नगर पंचवटी नाशिक,पंचवटी,नाशिक शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | शेषराव महाराज चौक म्हसोबा गल्ल,वैशाली नगर पंचवटी नाशिक,पंचवटी,नाशिक शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती शिला सूर्यवंशी | | | 1. नाशिक ,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीमती हिरा सूभाष शिर्के | | | 1. नाशिक ,नाशिक शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

II गु.र.नं.42/2021 , भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे संशोधन सन 2018 चे कलम 7, 7 अ. फिर्यादी-भगवान विठोबा बोराडे वय-82वर्षे व्यवसाय-माजी सैनिक रा-शेषराव महाराज चौक म्हसोबा गल्ली वैशाली नगर पंचवटी नाशिक3मो.न.7741903064.आरोपी-1)श्रीमती शिला सूर्यवंशी वय-42वर्षे व्यवसाय-नोकरी,समुपदेशक महिला समूपदेशक केंद्र नाशिक.2)श्रीमती हिरा सूभाष शिर्के वय-35 व्यवसाय-गृहिणी रा-नाशिक अ.घ.ता.वेळ व ठिकाण-दि.02/03/2021रोजी16/17वा.सू.महिला समूपदेशण केंद्र नाशिक तालूका पो.स्टे आवारात नाशिक. हकिगत-वरिल ता वेळी व ठिकाणी यातील आ.म.यानी फिर्यादी व त्याची पत्नी याचेतील असलेला वाद मिटविण्यासाठी यातील आरोपी न.1हिने दि.02/03/2021रोजी पंच आणि साक्षिदार याचे समोर लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम वर नमूद ठिकाणी आरोपीत म. 1 यानी आरोपी न.2हिस घेण्यास सांगितले वरून सदर लाचेची रक्कम आरोपी न.2हिने घेतले अशा प्रकारे यातील आरोपीत न.1शिला सुर्यवशी यांनी स्वताचे पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून स्वताचा सांपतिक फायदा करून घेण्याच्या हेतूने कायदेशिर परिश्रमा खेरीज अन्य पारितोषण म्हणून लाचेची मागणी करून लाचेची रक्कम हि खाजगी व्यक्ती श्रीमती हिरा शिर्के याच्या हस्ते स्विकारली म्हणून गून्हा वगैरे मजकूराची फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करून गुन्हयाची एक प्रत अधिकार असणारे मा.न्यायालय सो याना रवाना करण्यात आलेली आहे सदरचा गुन्हा हा मा. वरिष्टाच्या आदेशान्वये श्री प्रंशात सपकाळे पो.निरी.अँटि करप्शन ब्युरो नाशिक याचे कडे गुन्ह्याचा पूढिल तपास देण्यात आलेला आहे.



Scanned with CamScanner

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): HEMANT KALYANRAO SOMVANSHI(I (Inspector)) / **or** (किंवा) PBMH48737

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
सरकारवाडा पोलीस स्टेशन
नाशिक शहर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): HEMANT KALYANRAO SOMVA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH48737



Scanned with CamScanner

फिर्याद

सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक शहर
दिनांक ०२/०३/२०२१

मी भगवान विठोबा बोराडे, वय-८२ वर्ष, व्यवसाय-माजी सैनिक (निवृत्ती वेतन धारक), रा. शेषराव महाराज चौक, म्हसोबा गल्ली, वैशाली नगर, पंचवटी, नाशिक-३, मो.नं. ७७४१९०३०६४.

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वर नमूद पत्त्यावर माझा नातू प्रविण विजय बोराडे यांचे सोबत राहून सेवानिवृत्ती वेतनावर माझा उदरनिर्वाह करतो. माझे व माझी पत्नी सौ.गंगूबाई (शांताबाई) भगवान बोराडे मध्ये कौटूंबिक वाद आहेत. त्यावरुन माझे पत्नीने माझे विरुध्द पोलीसांकडे तक्रार दिली होती. नमूद तक्रारीवरून महीला समूपदेशन केंद्र, नाशिक यांचेकडुन मला दिनांक १०/०२/२०२१ रोजी त्यांचे कार्यालयात हजर राहण्याची लेखी नोटीस मिळाली. त्यावरून मी दि.१०.०२.२०२१ रोजी नमुद कार्यालयात गेलो असता तेथिल श्रीमती सुर्यवंशी मॅडम यांनी मला माझे पत्नीला ७,०००/-रू. दरमहा देण्यास सांगितले. मी लगेच त्यांचे समक्ष माझे पत्नीला रोख ७,०००/-रू. दिले. मात्र त्याबाबत मला कोणतीही पावती देण्यात आलेली नाही. त्यानंतर दि. ०१.०३.२०२१ रोजी श्रीमती सुर्यवंशी मॅडम यांनी मला त्यांचे कार्यालयात बोलावुन घेतले. त्यावेळी श्रीमती सुर्यवंशी मॅडम यांनी मला सांगितले की, तुम्ही तुमच्या पत्नीला वेळेवर पैसे देत नाहित व वरून मारहाण करतात. त्यामुळे मला तुमच्याविरूध्द गुन्हा दाखल करावा लागेल व तुमचे प्रकरण वरपर्यन्त पाठवावे लागेल. जर तुम्हाला तुमचे विरूध्द गुन्हा दाखल होवु द्यायचा नसेल व प्रकरण इथेच मिटवायचे असेल तर तुम्हाला तुमचे पत्नीला दरमहा १०,०००/-रू. द्यावे लागतील. तसेच तुमचे प्रकरण इथेच मिटविण्यासाठी मला वेगळे १०,०००/-रू. द्यावे लागतील. आणि जर तुम्ही मला १०,०००/-रू. दिले नाही, तर मी तुमच्या विरुध्द गुन्हा दाखल करेल व तुम्हाला पेन्शनपण मिळु देणार नाही. त्यावर मी त्यांना आत्ता माझेकडे इतके पैसे नाहित असे सांगितले. त्यावेळी श्रीमती सुर्यवंशी मॅडम यांनी मला दि.०२.०३.२०२१ रोजी त्यांचे स्वतःसाठी १०,०००/-रू. घेवुन त्यांचे कार्यालयात बोलाविले मला श्रीमती सुर्यवंशी मॅडम यांना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे, १०,०००/-रू. लाच देण्याची इच्छा नसल्याने मी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नाशिक कार्यालयात जावून माझी वरील प्रमाणेची तक्रार पोलीस निरीक्षक श्री.प्रशांत सपकाळे यांचेकडे लिहुन त्यावर सही केल्यानंतर सदर तक्रारीवर पोनि श्री सपकाळे व पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर माझे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे महिला समुपदेशन केंद्र नाशिक येथील सुर्यवंशी मॅडम हया खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच न.१ श्री.पाटील असे आम्हाला पोनि श्री.सपकाळे यांनी योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते माझेकडे देवुन मला पंच नं.१ श्री.पाटील यांचेसह माझे कडील दुचाकी वाहनाने जुन्या सीबीएस जवळ असलेल्या नाशिक तालुका पोलीस स्टेशन आवारातील महिला समुपदेशन केंद्र, नाशिक येथे रवाना केले. त्यानंतर महिला समुपदेशन केंद्र, नाशिक येथे माझी सुर्यवंशी मॅडम यांचे सोबत भेट झाली तेथे त्यांनी मला मी तक्रारीत नमुद केल्या प्रमाणे १००००/- रू. आणून देण्यास सांगीतले.

त्यानंतर मी व पंच नं. १ श्री.पाटील आम्ही माझे दुचाकीवरून अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, नाशिक कार्यालयात परत आलो. त्यावेळी पोनि श्री.सपकाळे यांचे आदेशावरुन पोना/कराड यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवून बंद केले. त्यानंतर पोनि श्री सपकाळे साहेब यांनी मला व पंच नं. १ श्री.पाटील यांना घडलेली हकीकत विचारली असता आम्ही वरील प्रमाणे सांगीतलेल्या हकिगती वरून व व्हाईस रेकॉर्डरमध्ये माझेत व श्रीमती सूर्यवंशी मॅडम यांच्यात रेकॉर्ड झालेले संभाषण पो.नि. सपकाळे, पोनि निकम, पंच व सापळा पथकातिल सदस्यांनी ऐकल्यानंतर श्रीमती सूर्यवंशी हया माझेकडे पैशांची मागणी करीत असल्याचे सर्वांची खात्री झाली. त्यानंतर पोनि सपकाळे यांचे सूचने प्रमाणे मी दोन्ही पंचासमक्ष लोकसेवक यांना द्यावयाची लाचेची रक्कम १००००/- रूपये त्यात ५०० रूपये दराच्या २० चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांना पोना वैभव देशमुख यांचे करवी अ.पा. लावून त्या नोटा माझे शर्टचे खिशामध्ये ठेवून दिल्या त्यानंतर पो.ना. वैभव देशमुख यांनी नोटांना पावडर लावलेली असल्याने त्यांना पुढील कार्यवाहीतून वगळण्यात आल्याने ते त्यांचेकडील साहित्यानिशी ला.प्र.वि.नाशिक कार्यालयातील त्यांचे कक्षाकडे निघून गेले. नंतर मला व पंचाना पो.नि. श्री सपकाळे यांनी योग्य त्या सुचना दिल्या. वरील प्रमाणे केलेल्या कारवाई बाबतचा सविस्तर पडताळणी/सापळापूर्व पंचनामा ला.प्र.वि. नाशिक कार्यालयात टंकलिखीत करण्यात आला.

पडताळणी सापळा पूर्व पंचनामा संपल्यानंतर महिला समूपदेशक, श्रीमती सूर्यवंशी मॅडम यांनी १००००/- रूपये लाचेची रक्कम घेवून मला महिला समूपदेशन केंद्र, नाशिक, नाशिक तालूका पोलीस स्टेशन आवार नाशिक येथे बोलाविले असल्याने मला व पंच नं१ श्री पाटील आम्हाला श्री सपकाळे साहेब यांनी योग्य त्या सूचना देवून लाचेची रक्कम, व्हाईस रेकॉर्डर सह माझेकडील दुचाकीने रवाना करून आमचे पाठोपाठ पंच नं.२ श्री चित्ते, सापळा पथकातिल सदस्य शासकीय वाहनाने नाशिक तालुका पोलीस स्टेशन, नाशिक येथे येवून सापळा आयोजित केला. दिलेल्या सुचने प्रमाणे मी पंच नं.१ श्री पाटील यांचेसह महिला समूपदेशन केंद्र नाशिक येथे जावून श्रीमती सूर्यवंशी मॅडम यांची भेट घेण्यासाठी, त्यांचे कार्यालयात गेलो असता त्यांनी माझेकडे १००००/-रूपये लाचेची मागणी करून सदर रक्कम त्यांचे शेजारी खुर्चिवर बसलेल्या श्रीमती शिर्के यांचेकडे द्यायला सांगितले व श्रीमती शिर्के यांनी लाचेची रक्कम १००००/-रूपये स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा पोनि श्री सपकाळे यांनी ला.प्र.वि. कार्यालय, नाशिक, जि.नाशिक येथे केला आहे.

तरी दि.०२/०३/२०२१ रोजी श्रीमती शिला सूर्यवंशी, वय ४२ वर्ष, व्यवसाय - नोकरी, महिला समूपदेश, नेमणूक - महिला समुपदेशक केंद्र, नाशिक, नाशिक तालुका पोलीस स्टेशन आवार, नाशिक, जि.नाशिक यांनी माझे व माझे पत्नीमध्ये असलेला वाद मिटविण्यासाठी १००००/-रूपये लाचेची मागणी करून सदर रक्कम त्यांचे शेजारी खुर्चिवर बसलेल्या श्रीमती शिर्के यांचेकडे द्यायला सांगितले व त्यांनी लाचेची रक्कम १००००/-रूपये १६.१७ वाजेचे सुमारास नाशिक तालुका पोलीस स्टेशनचे आवारातील महिला समुपदेशन केंद्र कार्यालयात स्विकारली. अशाप्रकारे यातील श्रीमती शिला सूर्यवंशी, वय ४२ वर्ष, व्यवसाय - नोकरी, समुपदेशक, महिला समुपदेशन केंद्र, नाशिक यांनी स्वतःचे पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून स्वतःचा सांपत्तीक फायदा करून घेण्याचे हेतुने कायदेशिर परिश्रमीका खेरीज अन्य पारितोषण म्हणुन लाचेची मागणी करून लाचेची रक्कम खाजगी व्यक्ती श्रीमती हिरा सुभाष शिर्के यांचे हस्ते स्विकारली म्हणुन माझी त्यांचे दोघां विरूध्द लाचेची मागणी व लाच स्विकारले बाबत कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मला वाचुन दाखविली असता ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली

भ. वि. बोराडे

पोलीस ठाणे अंमलदार
सरकारवाडा पोलीस स्टेशन
नाशिक शहर

Scanned with CamScanner